Open Access

उदयगिरी - बहुभाषिक इतिहास संशोधन पत्रिका

(A Bimonthly, Refereed, & Peer Reviewed Journal of History)
Published by: AAASSHER, Mumbai, (MS) India
Journal homepage: https://udayagiri.aaassher.org/
ISSN (Online): 2583-8423
Volume 1, Issue 4, October 2023; Pages 234 – 237
DOI: 10.5281/zenodo.10115533

Original Research Article

# म. गांधीचा राजकीय प्रवास

प्रा. गौंड नामदेव संपतराव

भाई किशनराव देशमुख महाविद्यालय, चाकूर जिल्हा: लातूर ४१३५१३ महाराष्ट्र, भारत

*Corresponding author E-mail*: nsgond7@gmail.com

Received: 14 October, 2023 | Accepted: 25 October, 2023 | Published: 27 October, 2023

**प्रस्तावना**

म. गांधीनी आयुष्याची २१ वर्षे दक्षिण अफ्रीकेत घालवली, जेथे त्यांनी त्यांचे राजकीय दृष्टीकोन, नैतिक आणि राजकिय नेतृत्व कौशल्य विकसित केली. द. अफ्रीकेत आलेल्या अनुभवावरुन त्यांनी स्वतःचे समाजातीलस्थान आणि ब्रिटीश राज्यातील आपल्या लोकांची किंमत या बद्दल प्रश्न उपस्थित करण्यास सुरुवात केली तसेच भारतीया बद्दलच्या वंशभेद असमानता यांना समोरे गेल्यावर अन्याया विरुध्द आवाज उठवण्यास सुरुवात केली. द. अफ्रीकेतील वास्तव्य अनुभव हिच म. गांधीची राजकीय क्षेत्रात येण्याची सुरुवात होती.

इ.स. १९१५ मध्ये गांधीजी कायमसाठी भारतात परतले. एक प्रमुख भारतीय राष्ट्रवादी, संघटक अशी त्यावेळी त्यांची ख्याती होती. ते भारतीय कॉंग्रेसच्या अनेक संमेलनात बोलले. ब-या अर्थी भारताचे राजकारण व समस्या यांचा परिचय त्यांना गोपाळ कृष्ण गोखले यांनी करुन दिला. ते भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसचे प्रमुख होते. आजही ते गांधीजीचे राजकीय गुरु म्हणुन ओळखले जातात. त्यांनतर भारताला स्वातंत्र्य मिळेपर्यंत म. गांधीनी स्वतः ला झोकुन देऊन कार्ये केली. ते करत असताना त्यांनी सत्य, अहिंसा, असहकार, सत्याग्रह अशा अनेक मार्गाचा अवलंब केला. भारतीय राजकारणात सक्रीय झाले.

**गांधीजीच पहिले राजकीय लेखन**

म. गांधीचे पहिले राजकीय लेखन १४ ऑगष्ट १८९६ रोजी प्रसिध्द झाले.

'द ग्रिव्हर्न्सस ऑफ दी ब्रिटीश इंडियन्स इन साऊथ अफ्रीका: ॲन अपील टू द इंडियन पब्लिक' या नावाची पुस्तिका 'ग्रीन पॅम्प्ले' (हरित पत्रीका) म्हणून सर्वत्र ओळखली जाते. त्यातुन गांधीचे राजकीय तत्वज्ञान प्रथमच जगासमोर आले. गांधी यांच्या (महात्मा गांधीकडे) होणा-या प्रवासाची ती अधिकृत नांदी होती.

**राजकीय प्रवेश**

१९१६ नंतर भारतीय राजकारणात गांधीचा प्रवेश झाला. डिसेंबर १९२१ मध्ये भारतीय राष्ट्रीय कॉंग्रेसचे पूर्ण अधिकार गांधीना देण्यात आले. असहकार चळवळीने ब्रिटीशांना विरोधाला प्रारंभ केला

- १९२२ मध्ये चौरीचौरा येथील हिंसात्मक घटनेमुळे असहकार कार्यक्रम मागे घेतला.
- १९२७ सायमन परत जा 'Go Back सायमन' अशा घोषणा देऊन सायमनला परतावून लावले.
- मार्च १९३० मिठाच्या कराविरुध्द दांडी यात्रेला सुरुवात.
- १९३० ला गोलमेज परिषदेत अनुपस्थिती १९३१ आयर्विन करार
- १९३२ पुणे येथे गांधी व आंबेडकर यांच्यात पुणे करार.
- ऑगष्ट १९४२ चलेजाव चळवळ केली.
- ३० जानेवारी १९४८ ला बिर्ला मंदिरात जात असताना नथुराम घोडसे नी गोळी मारली व 'हे राम' म्हणून त्यांनी प्राण सोडला.

**म. गांधीच्या विचारावर प्रभाव**

- कौंटुबिक वातावरण आणि धर्मग्रंथ
- घरातील धार्मिक वातावरणाचा तसेच भगवत गीता या ग्रंथाचा मोठा प्रभाव होता. जैन, बौध्द धर्माच्या अहिंसेच्या विचारांनी ते प्रभावित झाले. श्रावणबाळ आणि हरिश्चंद्र या कथाचाही त्यांच्यावर प्रभाव होता.
- जॉन रस्किन, टॉलस्टॉय, ना.गोखले, योरो अशा अनेक व्यक्ती व परिस्थितीचा प्रभाव त्यांच्यावर होता.

**म. गांधीचे राजकीय विचार**

रस्किनच्या विचारांशी गांधी यांचे आध्यात्मिक पातळीवरचे संबध जोडले गेले असले तरी राजकीय दृष्ट्या या दोंघाच्या विचारात खूप फरक आहे. राजकीय क्षेत्रात टॉलस्टॉय थोरोंच्या विचारांचा म. गांधीवर प्रभाव होता. कारण आपल्या आयुष्यातील ब-याच घटनांचे श्रेय ते टॉलस्टॉय यांना देतात. ही वस्तुस्थिती असली तरी म. गांधी टॉलस्टॉय यांना पूर्णपणे मानणारे होते असे नव्हे. 'सत्याग्रह' ही कल्पना टॉलस्टॉय यांच्या सविनय प्रतिकारापेक्षा निराळी आहे. सत्याग्रहाला म. गांधी च्या विचारात सर्वश्रेष्ठ स्थान आहे त्यांचा सत्याग्रहाचा सिध्दांत वरवर राजकीय वाटत असला तरी त्याचे खरे स्वरुप नैतिकच आहे.

- म. गांधीनी राजकीय विचारात धर्म व नितीला महत्व दिले. धर्माविना राजकारण म्हणजे आत्म्याविना शरीर असे ते मानतात.

**धर्म आणि राजकारणचा संबंध**

म. गांधीच्या मते धर्म आणि राजकारण यांची फारकत करता येत नाही. धर्माचा संबध कर्तव्याशी जोडल्याने समाजाविषयीच्या कर्तव्य भावनेने केलेले कार्य म्हणजे राजकारण होय. अशा प्रकारे भारतीय राजकीय विचारात धर्माला व नैतिकतेला महत्त्व दिले.

- राजकारण व नितीशास्त्र यांची झालेली फारकत गांधीजींना मान्य नव्हती.
- धर्माचा अर्थ - नैतिक कर्तव्याचे स्वच्छेने पालन करणे होय. कर्मकांड किंवा विशिष्ट धर्म नव्हे असा व्यापक धर्माबद्दल दृष्टीकोन अभिप्रेम होता. थोडक्यात सर्वधर्म समभाव म्हणजे सर्व धर्म समान आहेत.

**सत्य आणि अहिंसा**

म.गांधीच्या राजकीय विचारांचा पाया सत्य हे साध्य तर अहिंसा हे त्यांनी वापरलेले साधन होते. गांधीजींनी सामाजिक जीवनाप्रमाणेच राजकीय जीवनात सत्याला महत्व दिले. सत्याच्या पूजकाने मान पाळणे आवश्यक आहे.

**१) जनहितासाठी राजकारण**

गांधीजीचे सत्याग्रहा संबधीचे विचार नैतिक मूल्यावर आधारित आहेत. अहिंसा आणि सत्यावर त्यांची उभारणी झाली आहे. गांधीजीच्या मते ते उद्देश आपल्याला प्राप्त करायचे आहेत ते शुचिभूत शुध्द असलेच पाहिजे.

राजकारणात सर्व चालते असा लोकांचा गैरसमज आहे. वास्तविक असे नाही राजकारणात निती आणि धर्माची जोड असणे त्यानी आवश्यक मानले. राजकारण हे स्वार्थासाठी वापरण्याचे साधन नाही. निःस्वार्थीपणे लोकहितासाठी वापरण्याचे ते एक साधन आहे. केवळ ध्येय हा साधनाचा निकष अयोग्य.

हुकुमशाहा नेहमीच उच्च धैय्याची भाषा वापरुन वाटेल तशा साधनांचा वापर करतात. लोकांवर अनेक प्रकारचे अत्याचार करतात आणि धैय्याची प्राप्ती हा साधनांच्या योग्यतेचा निकष ठरवितात ते गांधीजींना मान्य नव्हते.

देशाला स्वातंत्र मिळवणे हा गांधीजीच्या समोरील उद्देश होता. पणे ते जर चुकीच्या म्हणजे हिंसाचार, रक्तपात करुन मिळत असेल तर गांधीजीना ते नको होते. गांधीनी ब्रिटिशांविरुद्ध चळवळ सुरु केली पण तिला अनिष्ठ वळण लागल्याने मागे घेतली.

**सत्याग्रह**

सत्याग्रहाचा प्रयोग फक्त राजकीय क्षेत्रात लागू करता येण्यासारखा नसुन जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात लागू केला जाऊ शेकतो. असे त्यांचे मत होते सत्याग्रह या संकल्पनेत दुस-यांचे ह्यदय परिवर्तन घडवून आणण्याचे तत्व समाविष्ट आहे.

सत्याग्रह मनुष्याचा केवळ पवित्र असा अधिकारच नाही तर ते पवित्र कर्तव्य सुध्दा आहे. समजा सरकार जनतेच्या इच्छेचे प्रतिनिधीत्व करीत नसेल आणि अन्यायी विश्वास घातकी लोकांना पाठिंबा देत असेल तर अशा सरकारच्या आज्ञा नाकारण्याचा प्रत्येक नागरिकाला अधिकार आहे नव्हे ते तिच पवित्र कर्तव्य आहे. सत्याग्रहाच्या मार्गाने नक्कीच विजय असतो असे म. गांधीजीचे मत होते.

सत्याग्रहाच्या प्रयोगासाठी जो मार्ग साधनांचा अवलंब करण्याचे सुचीत केले ते असे

१. असहकार
२. सविनय कायदेभंग
३. उपोषण
४. हरताळ
५. हिजस्त (देश त्याग)
६. बहिष्कार

ही सर्वतंत्रे राजकीय क्षेत्रा बरोबरच सामाजिक क्षेत्रात सुध्दा उपयोगी ठरलेले आहेत.

**सारांश**

म.गांधीचे तत्वज्ञान हे सुस्पष्ट नाही अशी टिका त्यांच्या विचार धारेच्या बाबतीत केली जाते. आपल्या विचारात त्यांनी सातत्याने परिस्थिती नुसार बदल केला आहे. ह्रदयपरिवर्तन अवघड सत्य, अहिंसेला मुलभुत मार्गाचा अवलंब केला. परंतु सत्याग्रहाची संकल्पना प्रत्येक ठिकाणी यशस्वी होऊ शकत नाही. अहिंसा प्रत्यक्षात अशक्य आहे. मनुष्याची स्वार्थी प्रवृत्ती असते. त्याची मुळ प्रवृत्ती सहसा बदलत नाही. व्यक्तीच्या सदगुणांचाच विचार केला आहे. दुर्गुणाकडे दुर्लक्ष होते.

म. गांधीचा जीवन विषयक दृष्टीकोन अतिशय व्यापक आहे. अहिंसा हे प्रभावी शस्त्र आहे. सत्याग्रहाच्या सहाय्याने अति लहरी आणि दडपशाही शासन नष्ट करता येते हे त्यांनी सिध्द केले. म.गाधीनी व्यक्ती विकास, लोकशाही, ग्रामराज्य, स्वराज्य आदी बाबीच्या यशस्वीतेसाठी विकेंद्रीकरणाला महत्व दिले. म गांधीच्या विचारातील नावीण्यपूर्ण बाब म्हणजे त्यांनी राजकारणाच्या अध्यात्मीकरणाला महत्व दिले.

अशा प्रकारे म.गांधीआपल्या तत्वज्ञानात राजकीय विचाराला महत्व दिले आहे. शास्त्रीय स्वरुपाच्या राजकीय विचरांची मांडणी केली. परपंरा आणि नवीन नविरांचा संगम त्यांच्या विचारांत दिसतो. सत्ता बंदुकीच्या सहाय्याने मिळतेहा मानोबादी विचार गांधीना मान्य नव्हता. अहिंसेचे पुजारी असलेल्या गांधीनी सनदशीर मार्गावर भर दिला. यावरुन आजही त्यांच्या विचाराची समाजाला असलेली आवश्यकता स्पष्ट होते.

**संदर्भ सूची**

१. भारतीय राजकीय विचारवंत – डॉ. ना.थ.डोके
२. भारतीय राजकीय विचारवंत - प्रा. डॉ. शुभांगी राठी
३. भारतीय सामाजीक विचारवंत – डॉ. दा. धो. काचोळे
४. भारतीय राजकीय विचारवंत – बी. वाय. कुलकर्णी
५. Panthom Thomas and Kenneth Deutsch
६. Political Thoughts in Moder India
७. म. गांधी : कार्य व विचारप्रणाली – बोस निर्मलकुमार अनुवाद - बापट भा. रा.
८. गांधी पर्व – पर्वते त्र्य. वि.